# मेट्रो भुयारीकरणाचा ३६वा टप्पा पूर्ण

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

मेट्रो-३ मार्गावरील सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ दरम्यानचा ३६ वा भुयारीकरणाचा टप्पा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे पूर्ण करण्यात आला आहे. तापी-१ आणि तापी-२ या दोन टनेल बोअरिंग मशिन्स (टीबीएम) च्या मदतीने पॅकेज-६ ने एकूण ४.४ किमीचे भुयारीकरण पूर्ण केले आहे.



- पॅकेज ६ अंतर्गत आंतरदेशीय विमानतळ (CSMIA-T1), आंतरराष्ट्रीय विमानतळ (CSMIA-T2) आणि सहार रोड मेट्रो स्थानकांचा समावेश असून या पॅकेजमध्ये खालीलप्रमाणे ४ भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले आहेत.
- आंतरराष्ट्रीय विमानतळ (CSMIA-T2) ते सहार रोड (अपलाइन - ६८७ मीटर आणि डाउनलाइन - ६९२ मी)
- सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ (CSMIA-T1), (अपलाइन - १५१५ मीटर आणि डाउनलाइन - १५१२ मीटर)

## पॅकेज ६ चे भुयारीकरण १०० टक्के

पॅकेज ६मधील भुयारीकरण १०० टक्के पूर्ण करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या पॅकेजमधील दोन स्थानके आंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनलवर आहेत. या दोन्ही स्थानकांना एअरपोर्ट टर्मिनलशी जोडले जाईल. त्यामुळे विमानतळापर्यंत प्रवास करणे प्रवाशांना अधिक सोयीस्कर होणार आहे, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी सांगितले.

'हार्ड रॉक तंत्रज्ञानाने सुसज्ज टेरटॅक निर्मित टीबीएम तापी १ आणि २ द्वारे १५ महिन्यांत भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. आंतरदेशीय विमानतळ (CSMIA-T1) स्थानकाचे जवळपास ७६.४ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे, असे संचालक एस. के. गुप्ता यांनी स्पष्ट केले. मेट्रो ३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५०.३ किमी (९३ टक्के) भुयारीकरण पूर्ण झाले आहे.